# पहिल्या दिवशी १५ जणांच्या मुलाखती

## कुलगुरू पदासाठीच्या मुलाखतीची प्रक्रिया सुरु : शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील चौघे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठीच्या मुलाखतींची पहिली फेरी शनिवारपासून सुरु झाली. कुलगुरु शोध समितीकडून ऑनलाईन मुलाखती घेण्यात आल्या. या प्रक्रियेच्या पहिल्या दिवशी १५ जणांच्या मुलाखती पार पडल्या. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील चौघांचा समावेश होता. आज, रविवारी उर्वरित १० उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत.

या समितीने गेल्या दीड आठवड्यापूर्वी ईमेलद्वारे प्रत्येक उमेदवाराला त्याच्या मुलाखतीचा दिवस आणि वेळ कळविली होती.

### अशी झाली मुलाखतीची प्रक्रिया

या समितीतील सदस्यांनी प्रत्येक उमेदवाराशी साधारणपणे २० ते ३० मिनिटे संवाद साधला. सुरुवातीला या उमेदवारांना विद्यापीठाबाबत त्यांचे



व्हिजन, स्वत:बद्दलची माहितीचे सादरीकरण करावयास सांगितले. त्यानंतर प्रश्नोत्तरे झाली. त्यात विद्यापीठ प्रशासन, नवीन शैक्षणिक धोरण, विद्यापीठ कायदा, विद्यापीठ अनुदान आयोगाचे नियम, कौशल्य विकासाच्या दृष्टीने शिक्षण, विद्यापीठासाठी कसे योगदान देणार, संशोधनातील कामगिरी, आदी विषयांचा समावेश होता.

वाजल्यापासून मुलाखतीची प्रक्रिया सुरु झाली. कुलगुरु शोध समितीतील सदस्यांकडून दिवसभरात साधारणत: १५ उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यात शिवाजी विद्यापीठाचे

पदार्थविज्ञान विभागातील डॉ. व्ही. जे. फुलारी, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव डॉ. आर. व्ही. शेजवळ, सांगलीतील पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी.

चार उमेदवारांचा समावेश होता. त्यातील डॉ. शिर्के, प्राचार्य कणसे आणि शेजवळ यांनी पहिल्यांदाच कुलगुरुपदासाठी मुलाखत दिली. अन्य ११ उमेदवारांच्याही दिवसभरात मुलाखती घेण्यात आल्या.

त्यात औरंगाबादचे एम. व्ही. काळे, डब्ल्यू. के. सरवदे, एम. बी. मुळ्ये, लातूरचे आर. एस. अवस्थी, नाशिकचे दिलीप पानगव्हाणे, नागपूरचे डॉ. के. सी. देशमुख, प्रदीप कुंडल, नांदेडचे जी. एन. शिंदे, दीपक पानस्कर, एल. एम. वाघमारे, आदींचा समावेश होता. दरम्यान, या २५ जणांमधून अंतिम मुलाखतीच्या फेरीसाठी कोणत्या पाच उमेदवारांची निवड होणार याबाबत विद्यापीठाच्या घटकांना उत्सुकता लागली

# कुलगुरू पदासाठी १५ जणांच्या मुलाखती

## शिर्के, फुलारी, शेजवळ, कणसेंचा समावेश

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २६ : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी आज पंधरा जणांच्या मुलाखती झाल्या. यामध्ये प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, डॉ. आर. व्ही. शेजवळ, डॉ. विजय फुलारी, डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह अन्य अकरा जणांचा समावेश होता.

कुलगुरू पदाच्या निवडीला वेग आला आहे. पदासाठी १६९ जणांनी अर्ज केले होते. अर्जांची छाननी केल्यानंतर त्यातून २८ जणांची यादी प्रसिद्ध केली. सर्वांच्या मुलाखती सुरू असून, आज १५ जणांच्या मुलाखती झाल्या. यामध्ये विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, डॉ. आर. व्ही. शेजवळ, डॉ. विजय फुलारी आणि डॉ. डी. टी. शिर्के यांच्याही मुलाखती झाल्या. मुलाखत ऑनलाईन झाली असून प्रत्येक उमेदवारास २० ते ३० मिनिटे वेळ दिला होता. शोध समितीच्या सदस्यांनी ह्या मुलाखती घेतल्या. यामध्ये उमेदवारांचे संशोधन, आजपर्यंतच्या कारकिर्दीतील महत्त्वाचे टप्पे, विद्यापीठाबाबतची माहिती, शिवाजी विद्यापीठाच्या पुढील वाटचालीबद्दल असणारी मते, धोरण याविषयीचे प्रश्न विचारले. रविवारी (ता. २७) उर्वरित उमेदवारांच्या मुलाखती होणार आहेत. यानंतर २८ उमेदवारांमधून ५ जणांची निवड केली जाईल. त्यांच्या मुलाखती स्वतः राज्यपाल घेणार आहेत. त्यानंतर या पाच जणांमधून कुलगुरूंची निवड होईल.

# पहिल्या दिवशी १५ जणांच्या मुलाखती

## कुलगुरू निवड : विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अकरा जणांचा समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू निवड प्रक्रियेअंतर्गत शोध समितीकडून शनिवारपासून पात्र उमेदवारांच्या व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे मुलाखतीस प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी १५ जणांच्या मुलाखती झाल्या. यात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, डॉ. आर. व्ही. शेजवळ, डॉ. विजय फुलारी, डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासह अकरा जणांचा समावेश आहे.

कुलगुरू निवड प्रक्रिया अंतिम टप्प्यात आली आहे. या पदासाठी १६९ उमेदवारांनी अर्ज केले आहेत. शोध समितीने छाननी करून मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली होती. शोध समिती सदस्यांनी १५ मुलाखती घेतल्या. मुलाखतीसाठी ३० मिनिटांचा वेळ दिला होता. उमेदवारांनी शोध समितीसमोर प्रेझेंटेशन केले.



शिवाजी विद्यापीठातून...

यात उमेदवाराने केलेले संशोधन, प्रशासकीय अनुभव, विद्यापीठ कायदा, कारकिर्दीतील महत्त्वाचे टप्पे, विद्यापीठाबाबतची माहिती, विद्यापीठाच्यापुढीलवाटचालीबद्दलचे व्हिजन, धोरण आदी प्रश्न समिती सदस्यांनी विचारले. रविवारी (दि. २७) उर्वरित उमेदवारांच्या मुलाखती होणार आहेत. त्यामधून पात्र उमेदवारांची नावे निश्चित करून ती कुलपती कार्यालयास सादर केली जातील. संबंधित उमेदवारांचे कुलपती यांच्यापुढे सादरीकरण होऊन ते स्वतंत्र मुलाखती घेतील. त्यामधून कुलपती एकाची कुलगुरूपदी निवड होईल.

# कुलगुरुपदासाठी १५ उमेदवारांनी दिली मुलाखत

- शिर्के, फुलारी, शेजवळ, कणसे यांचा समावेश
- उर्वरित उमेदवारांच्या आज मुलाखती

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदाच्या निवड प्रक्रियेअंतर्गत २५ उमेदवारांच्या मुलाखत प्रक्रियेस शनिवार पासून प्रारंभ झाला. पहिल्याच दिवशी १५ उमेदवारांच्या मुलाखती ऑनलाईन पद्धतीने पार पडल्या. दरम्यान उर्वरीत १३ उमेदवारांच्या आज (रविवारी) मुलाखती होणार आहेत.

कुलपती कार्यालयाकडून कुलगुरु निवड प्रक्रियेअंतर्गत त्रिसदस्यीय शोध समिती नेमली आहे. इच्छूक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. यामध्ये कुलगुरु पदासाठी १६९ जणांनी अर्ज केले होते. अर्जांच्या छाननीनंतर कुलगुरु शोध समितीने मुलाखतीच्या पहिल्या फेरीसाठी २५ जणांची नावे निश्चित केली. या उमेदवारांच्या ऑनलाईन मुलाखतीस शनिवारपासून प्रारंभ झाला.



शनिवारी मुलाखतीच्या पहिल्या दिवशी डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. व्ही. जे. फुलारी, डॉ. डी. जी. कणसे, डॉ. आर. व्ही. शेजवळ, पी. पी. माहुलीकर, डॉ. के. सी. देशमुख, प्रदुप कुंडल, जी. एन. शिंदे, एल. एम. वाघमारे, दीपक पानस्कर, एम. बी. मुळ्ये, डब्ल्यू. के. सरवदे, एम. व्ही. काळे यांच्या मुलाखती पार पडल्या. शोध समितीच्या सदस्यांनी सुमारे अर्धा तास सर्वच उमेदवारांची ऑनलाईन पद्धतीने मुलाखत घेतली.

**आज यांच्या होणार मुलाखती**

कुलगुरु पदासाठी २८ जणांच्या मुलाखती होणार आहेत. यापैकी १५ जणांच्या मुलाखती शनिवारी झाल्या. रविवारी आनंद भालेराव, विनायक देशपांडे, मिलिंद उमेकर, अनुभा खळे, अविनाश कुंभार, अंजली कुरणे यांच्यासह उर्वरीत उमेदवारांच्या मुलाखती रविवारी होणार आहेत.